**प्रेस नोट** दिनांक २५/०१/२०१९

**राजापूर तालुक्यातील भालावली गावचे तलाठी यांना लाच स्विकारल्यानंतर अटक**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी |
| गुन्हा नोंद क्रमांक | ---- |
| कलम | ---- |
| आरोपीचे नांव व कार्यालय | श्री. लक्ष्मण हिरामण पारडे, वय ३१ वर्षे, तलाठी सजा भालावली ता. राजापूर जिल्हा रत्नागिरी. सध्या रा. दिवटेवाडी, राजापूर ता. राजापूर जि. रत्नागिरी येथे भाडयाचे रूममध्ये, मुळ रा.मु.पो. मेंडका, ता. मुदखेड, जि. नदिड. कार्यालय-तहसिलदार कार्यालय,राजापुर ता. राजापुर जि. रत्नागिरी |
| मागितलेली लाचेची रक्कम | तुझ्या मनाने काय देशील ते दे कमी पडले तर मागुन घेईन असे म्हणुन लाचेची मागणी केली. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३,०००/- |
| थोडक्यात हकिगत | यातील लोकसेवक हे राजापूर तालुक्यातील सजा भालावली येथे तलाठी या पदावर काम करतात. तक्रारदार हे मौजे भालावली येथील येथील ग्रामस्थ असुन, त्यांचे काकाचे मृत्युपत्रानुसार व मा. अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडील निकालानुसार तलाठी सजा भालावली अंतर्गत महसुली गाव वरची गुरववाडी येथील शेतजमिनीचे सातबारा उताऱ्यावरील स्वत:चे नावाची नोंद करण्यासाठी तहसिलदार कार्यालय, राजापूर येथे माहे एप्रिल २०१८ मध्ये अर्ज सादर केला होता. सदर अर्जाचे अनुषंगाने तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. पारडे, तलाठी सजा भालावली यांची भेट घेवून, त्यांचे नावाची नोंद सातबारा उतारावर घेणेसाठी लोकसेवक यांचेकडे विनंती केली, त्यावर लोकसेवक यांनी "सर्कल ऑफिसर गावीत यांना भेटून त्याचे काहीतरी करावे लागेल व त्यांना स्वत:ला तक्रारदार यांचे मनाप्रमाणे काहीतरी दयावे लागेल'' असे बोलुन तक्रारदार यांचे कायदेशिर काम करणेसाठी लोकसेवकाने टाळाटाळ केली. लोकसेवकाची सदरची मागणी ही लाचेची मागणी असून त्यांना लाच दिल्याशिवाय ते तक्रारदार यांचे काम करणार नाहीत याची तक्रारदार यांना खात्री झाली. अशा आशयाची तक्रारी अर्ज दि.०९/०१/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय रत्नागिरी येथे दिला होता.<br>त्यासंबधाने तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. लक्ष्मण हिरामण पारडे यांची दि.१०/०१/२०१९ रोजी तहसिलदार कार्यालय, राजापूर जिल्हा रत्नागिरी येथे भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांचे सातबारा उताराचे काम करणेसाठी लाचेची मागणी केल्याचे पडताळणीमध्ये निष्पःन्न झाले.<br>त्या अनु ंगाने आज दिनांक २५/०१/२०१९ रोजी सदर सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. लक्ष्मण हिरामण पारडे, तलाठी, सजा भालावली, ता. राजापूर जि. रत्नागिरी यांना तक्रारदार यांचेकडुन ३,०००/-रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यानंतर त्यांना तहसिलदार कार्यालय राजापूर येथील अल्पबचत हॉल, वर्कस्टेशन येथे १०.४६ वाजता रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्र टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महारा ट्र राज्य यांचेशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेतस्थळ :- **acbmaharastra.gov.in**
ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- **acbmaharastra.net**
टोल फ्री क्र. :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२२-२५४२७९७९
व्हॉटस् ॲप क्रमांक :- ९९३०९९७७००

(डॉ. महेश पाटील)
पोलीस अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
ठाणे परिक्षेत्र, ठाणे